टिळक महाराष्ट्र विद्यापीठ (अभिमत विद्यापीठ) अंतर्गत कॉलेज ऑफ फिजिओथेरपी, पुणे येथे ०४ विषयात नवीन पदव्युत्तर भौतिकोपचार अभ्यासक्रम सुरू करण्याबाबत.

---

**महाराष्ट्र शासन**

शासन निर्णय क्रमांक एमईडी १०२२/प्र.क्र.२१३/२२/शिक्षण-२

वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग,

गो.ते. रुग्णालयाची नवीन इमारत, ९ वा मजला, गो.ते. रुग्णालय संकुल,

लोकमान्य टिळक मार्ग, नवीन मंत्रालय, मुंबई ४०० ००१

दिनांक:- ३०/०९/२०२२

संदर्भ:- १) आयुक्त, वैद्यकीय शिक्षण यांचे पत्र क्र. DMER-११०१५/१३/२०२२, दिनांक २३/०६/२०२२

२) महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचे पत्र क्र.मआविवि/पीबी/पीजी/६९८/२०२२, दिनांक ०४/०५/२०२२.

३) कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, विद्यापीठ भवन, मुकुंद नगर, गुलटेकडी, पुणे यांचे पत्र क्र.फिजिओ/२०२१/८०, दिनांक ०२/०८/२०२१.

<u>प्रस्तावना :-</u> टिळक महाराष्ट्र विद्यापीठ (अभिमत विद्यापीठ) अंतर्गत कॉलेज ऑफ फिजिओथेरपी, पुणे येथे ०४ नवीन पदव्युत्तर भौतिकोपचार अभ्यासक्रम सुरु करण्याबाबत विद्यापीठाकडून संदर्भ क्र.३ वरील पत्रान्वये प्रस्ताव प्राप्त झाला होता. त्यास अनुसरून संचालनालयाकडून सक्षमता तपासणीचा अहवाल संदर्भाधीन क्र.१ च्या पत्रान्वये शासनास प्राप्त झाला आहे. संचालनालयाने सादर केलेला सक्षमता तपासणी अहवाल व शिफारस विचारात घेऊन उक्त महाविद्यालयात भौतिकोपचार पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय:-</u> वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय यांनी केलेली शिफारस विचारात घेऊन शासन याद्वारे टिळक महाराष्ट्र विद्यापीठ (अभिमत विद्यापीठ) अंतर्गत कॉलेज ऑफ फिजिओथेरपी, पुणे या महाविद्यालयातील पुढील तक्यातील नवीन पदव्युत्तर भौतिकोपचार पदव्युत्तर अभ्यासक्रम त्यासमोर नमूद केलेल्या प्रवेशक्षमतेसह सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षापासून सुरु करण्यास शासनाची मान्यता देत आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रम | प्रवेशक्षमता |
|---|---|---|
| १ | MPTh ( Musculoskeletal Sciences) | ०६ |
| २ | MPTh ( Neuro Sciences) | ०६ |
| ३ | MPTh ( Cardiocvascular and Respiratory Sciences ) | ०६ |
| ४ | MPTh ( Community Based Rehabilitation ) | ०३ |

२. उपरोक्त मान्यता ही पुढील अटी व शर्तीच्या अधीन राहील :-

१) या संस्थेतील भौतिकोपचार पदव्युत्तर अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता उपरोक्त तक्त्यात निर्धारित केल्याप्रमाणे राहील.

२) राज्य शासन, केंद्रशासन, मा. सर्वोच्च न्यायालय अथवा मा. उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार सदर अभ्यासक्रमाच्या प्रवेशांकरिता निश्चित करण्यात आलेली कार्यपध्दती अवलंबिण्यात यावी.

३) शासकीय नियम / कायदा तथा मा. सर्वोच्च न्यायालय व मा. उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्णयानुसार शैक्षणिक शुल्क आकारणीसाठी कार्यपध्दती अनुसरणे भाग असेल त्याप्रमाणे शैक्षणिक शुल्क निश्चित करण्यात यावे.

TMV's College of Physiotherapy Gultekdi, Pune-37.

४) केंद्र शासन, राज्य शासन तसेच महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांनी भौतिकोपचार अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांबाबत वेळोवेळी विहित केलेल्या नियमांचे व मानकांचे पालन करणे संस्थेवर बंधनकारक राहील.

५) महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिट्यूट (प्रोहिबीशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ (महाराष्ट्र ॲक्ट १९९८ चा ६)मधील तरतुदींचे संस्थेने काटेकोरपणे पालन करणे आवश्यक राहील.

(६) सदरहू संस्थेस कायम विना अनुदान तत्वावर मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे संस्था आवर्ती / अनावर्ती स्वरुपाच्या खर्चासाठी अनुदानाची मागणी शासनाकडे करणार नाही.

७) संस्थेने कोणत्याही परिस्थितीत शासनाने मान्य केलेल्या विद्यार्थी प्रवेशक्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी प्रवेशित करु नयेत.

८) शासकीय वैद्यकीय/ भौतिकोपचार किंवा तत्सम महाविद्यालयातील कोणत्याही अध्यापकास तो सेवानिवृत्त होईपर्यंत संस्थेमध्ये नोकरी देता येणार नाही किंवा त्याच्या सेवा संस्थेस वापरता येणार नाहीत.

९) संबंधित विद्यापीठाने संस्थेस विद्यार्थी प्रवेश करण्यास परवानगी देण्यापूर्वी संस्था विहीत मानकांची पुर्तता करीत आहे याची खात्री करावी.

३. सदर आदेश हे महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ मधील कलम ६४(५) नुसार शासनास प्रदत्त असलेल्या अधिकारांचा वापर करून निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(अजित सासुलकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राज्यपाल सचिवालय, राज भवन, मलबार हिल, मुंबई
२. मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, मुंबई यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
३. मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, मुंबई यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
४. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा. मंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६. मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
७. मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
८. मा. राज्यमंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
९. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
१०. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक
११. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
१२. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण, मुंबई
१३. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई
१४. प्राचार्य/अधिष्ठाता, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ (अभिमत विद्यापीठ) अंतर्गत कॉलेज ऑफ फिजिओथेरपी, विद्यापीठ भवन, मुकुंदनगर, गुलटेकडी, पुणे -४११०३७
१५. निवडनस्ती (शिक्षण-२)

TMV's College of Physiotherapy
Gultekdi
Pune-37